श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय,यवतमाळ

शैक्षणिक सत्र-२०२६-२७

राज्यशास्त्र विभाग आणि अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

मार्गदर्शनपर कार्यक्रम

माहिती अधिकार दिन -दिनांक २८ सप्टेंबर २०२६

समाजाचा महत्वपूर्ण घटक म्हणून सर्व व्यक्तींना आपला सर्वांगिण विकास साध्य करण्याच्या उद्देश्याने लोकशाही शासनव्यवस्थेतील देशाच्या संविधानाने नागरिकांसाठी मूलभूत अधिकार कोणत्याही प्रकारच्या आधारावर भेदभाव न करता प्रदान केलेले असतात.महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आपल्या अधिकार आणि कर्तव्याबाबत माहिती व्हावी.त्यांच्यात जाणिवजागृती निर्माण व्हावी.या उद्देश्याने महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग आणि अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माहितीचा अधिकार अधिनियम -२०२५ आणि माहिती अधिकार दिन कार्यक्रमाचे आयोजन सोमवार दिनांक,२८ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आले.

प्रमुख वक्ते मार्गदर्शक म्हणून मा.ॲड. शुभम पुंडकर,जिल्हा व सत्र न्यायालय यवतमाळ तथा मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर,मा.प्रा.सचिन वानखेडे राज्यशास्त्र विभाग प्रमुख अमोलकचंद महाविद्यालय यवतमाळ उपस्थित होते.प्रत्येक भारतीय नागरिकाला आपल्याला प्राप्त असलेल्या माहितीच्या अधिकाराबाबत जागरूक असणे आवश्यक आहे माहिती मागवित असतांना अर्ज कशा पध्दतीने करणे.माहिती मागविण्याचा कालावधी लोकशाही व्यवस्थेतील पारदर्शकता आणि जबाबदारी याबाबत मार्गदर्शन प्रमुख वक्ते मा.ॲड.शुभम पुंडकर यांनी विद्यार्थ्यांना केले.तसेच समाजातील शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्याची जबाबदारी समाजातील सर्वच घटकांची आहे समाजाचा पर्यायाने देशाचा नागरिक म्हणून आपल्याला प्राप्त असलेल्या संविधानिक अधिकाराबाबत जाागरूक असणे आवश्यक आहे असे प्रबोधपर मार्गदर्शन ॲड.शुभम पुंडकर यांनी विद्यार्थ्यांना केले. माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ याबाबतची माहिती प्रास्ताविक सादर करीता असतांना प्रा.डॉ.संजय राचलवार यांनी विद्यार्थ्यांना दिली.कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रा.डॉ.कल्पना एस.गोडघाटे यांनी केले.महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.जयंत चतूर यांचे मार्गदर्शन लाभले.

